व्यंकटेश महाविद्यालयात नशामुक्ती अभियानांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन

" युवकांमधील नशेचे वाढते प्रमाण व व्यसनाधीनता संबंधित बातमी सध्या वर्तमानपत्रांच्या मथळ्यांमध्ये दिसून येत असून दिवसेंदिवस युवक व युवती नशेच्या आहारी जात आहेत. अनेक ठिकाणी ड्रग्स, नशिले पदार्थ यांचे साठे मिळत आहेत. देशाचे भवितव्य मानली जाणारी तरुणाईच आपले बहुमूल्य असे आयुष्य नशिले पदार्थ सेवन करून व्यसनाधीनतेमध्ये घालवत आहेत. त्यामुळे त्यांच्या उर्वरित आयुष्याची राखरांगोळी होते.नशा उत्पन्न करणाऱ्या पदार्थांच्या सेवनापासून दूर राहावे आपल्या मित्र मैत्रिणींना देखील यापासून दूर ठेवण्यासाठी प्रोत्साहित करावे व याबाबतीत जागरूकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे." असे प्रतिपादन इचलकरंजी येथील गावभाग पोलीस स्टेशनच्या एपीआय माने मॅडम यांनी केले. व्यंकटेश महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे नशा मुक्त अभियान अंतर्गत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी त्या बोलत होत्या. त्यांच्यासोबत उपस्थित राहिलेल्या महिला पोलिस अंमलदार कोमल पाटील मॅडम यांनी निर्भया पथक नेहमी मुलींच्या संरक्षणार्थ तत्पर असून मुलींनी निर्भया पथकाचा टोल फ्री क्रमांक एकशे बारा याची नोंद करून ठेवावी व केव्हाही विघातक किंवा संकटकालीन परिस्थिती उद्भवल्यास त्वरित या नंबर वर संपर्क साधावा तसेच कोणत्याही व्यक्तीकडून, नातेवाईकाकडून किंवा जवळच्या संपर्कातील व्यक्तीकडून कोणत्याही प्रकारचे लैंगिक शोषण अथवा इतर प्रकारचा त्रास उद्भवत असल्यास त्वरित निर्भया पथकास संपर्क साधावा. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने म्हणाले, " नशिल्या पदार्थांचे सेवन करून आपल्या आयुष्याची वाताहात करण्यापेक्षा महाविद्यालय स्तरावरील विद्यार्थ्यांनी अभ्यास करून विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून यश संपादन करावे. निर्भया पथक व पोलिसांच्या सहकार्याने अशा विद्यार्थ्यांना वेळीच आवर घालून त्यांना योग्य मार्गावर घेण्यासाठी पोलीस पथक नेहमी सदैव तत्पर असते." राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक आणि शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार यांनी आपल्या आई-वडिलांनी आपल्यासाठी घेतलेल्या कष्टाचा व आपल्यासाठी पै-पई गोळा करून शिक्षणासाठी खर्च करणाऱ्या पालकांचा विचार करावा आणि अशा प्रकारच्या कोणत्याही गैर व्यसनाच्या आहारी जाऊ नये, आपल्या आई-वडिलांना अभिमानास्पद वाटेल अशा प्रकारचे कर्तुत्व विद्यार्थ्यांनी करावे, अल्पकाळासाठी हवे हवेसे वाटणारे पण दीर्घकाळाचे नुकसान करणाऱ्या अशा वाईट प्रवृत्ती पासून विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी दूर राहणे हे नेहमी चांगले आहे असे ते म्हणाले. प्रतिष्ठित व नावाजलेले महाविद्यालय अशी ओळख असलेले श्री व्यंकटेश महाविद्यालय आहे आणि या महाविद्यालयातील विद्यार्थी विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी व यश संपादन केलेले आहे त्यामुळे या महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी नक्कीच अशा

कोणत्याही मार्गाचा अवलंब करणार नाहीत याची खात्री आम्हाला आहे असे गोविंदराव हायस्कूलचे शिक्षक मोहिते सर यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक मोहिते सर तर आभार शारीरिक शिक्षण संचालक श्री अमीन बाणदार सर यांनी केले. बी.कॉम. ,बीकॉम. आयटी व बीबीए विभागातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते त्याचबरोबर प्राध्यापक व प्राध्यापक इतर कर्मचारी देखील कार्यक्रमास उपस्थित होते.

